**Publication: Punya Nagari** **Date: Monday, 24th November, 2014**

**Edition: Mumbai**

XAT.COM

# इंडिया फर्स्ट इन्शुरन्स अॅट ५ कडून 'हॅप्पी इंडिया'चे अनावरण

**मुंबई :** नावीन्यपूर्ण कल्पना आणि बदल घडवण्याची तीव्र इच्छा असलेल्या तरुण बदलकर्त्यांना सामावून घेण्यासाठी इंडिया फर्स्ट लाइफ इन्शुरन्सने 'हॅप्पी इंडिया' या सामाजिक बदलाच्या उपक्रमाचे आयोजन ११ ते १६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी कंपनीच्या पाचव्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने केले आहे. या उपक्रमाची घोषणा कंपनीच्या पाचव्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात इंडिया फर्स्ट लाइफ इन्शुरन्सचे चीफ मार्केटिंग ऑफिसर मोहित रोचनाली यांनी केली.

या उपक्रमाच्या अनावरणाच्या निमित्ताने बोलताना मोहित रोचनाली म्हणाले की, 'आम्ही आमच्या सेवेची देशातील पाच वर्षे पूर्ण करत असताना हॅप्पी इंडियाची घोषणा करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. भारतात बदलाचे वारे वाहू लागले आहेत. नवीन सरकार भारताला चांगले करण्यासाठी अनेक नवीन उपक्रम हाती घेत आहे. अगदी वित्तीय समावेशापासून ते 'मेक इन इंडिया' आणि 'स्वच्छ भारत अभियाना'पर्यंत. आता आपल्याकडे विद्यार्थ्यांना या बदलाचा भाग केवळ मागणी करून नाही तर बदल घडवून होण्याची संधी देता येणार आहे.' हॅप्पी इंडियाचे उद्दिष्ट तरुण बदलकर्त्यांना शोधण्याचे व त्यांच्या आयडियाज फॉर चेंजची अंमलबजावणी करण्यासाठी सहकार्य करण्याचे आहे. यांत १५ शहरांमधील ५०० शाळांमधील २० हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी होणार आहेत.